| | | | |
|---|---|---|---|
| MHNG170006922025 | खटला दाखल तारीख | :– | ०६.०८.२०२५ |
| | खटला नोंदणी तारीख | :– | ०६.०८.२०२५ |
| | निकालाची तारीख | :– | ०५.०५.२०२६ |
| | कालावधी | :– | वर्ष, महिने, दिवस. |
| | | | ०० ०८ ३० |

**विद्यमान न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, भिवापूर, तह. भिवापूर, जि. नागपूर**
**(पिठासीन अधिकारी श्री. एस.जे. लाड)**

**नियमित फौजदारी खटला क्र.७७/२०२५ निशाणी क्रमांक ३४.**

प्रथम खबर मधील तपशिल :–
अपराध क्रमांक : २३४/२०२५, दिनांक २०.०४.२०२५
पोलीस स्टेशन : भिवापूर, ता. भिवापूर, जि. नागपूर.

| | |
|---|---|
| अभियोग पक्ष – | महाराष्ट्र सरकारतर्फे पोलीस स्टेशन अधिकारी, पोलीस स्टेशन भिवापूर, ता. भिवापूर, जि. नागपूर |
| अभियोग पक्षातर्फे विधीज्ञ | श्री एस.एस.मोरे |
| आरोपी – | **१. आयुष मारोती थुल,**<br>वय – २२ वर्षे, धंदा – –,<br>रा. सायगाव, ता. भिवापूर, जि. नागपूर.<br><br>**२. मारोती रामचंद्र थुल,**<br>वय – ५७ वर्षे, धंदा – –,<br>रा. सायगाव, ता. भिवापूर, जि. नागपूर.<br><br>**३. दुर्गा मारोती थुल,**<br>वय – ४७ वर्षे, धंदा – –,<br>रा. सायगाव, ता. भिवापूर, जि. नागपूर. |
| आरोपीतर्फे विधिज्ञ – | **श्री. पी.एल. नागोशे** |

| | |
|---|---|
| गुन्हा घडलेली तारीख | १९.०४.२०२५ |
| गुन्हा दाखल तारीख | २०.०४.२०२५ |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | ०६.०८.२०२५ |
| दोषारोप निश्चीत केल्याची तारीख | २३.०१.२०२६ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | १२.०३.२०२६ |
| न्यायनिर्णयाकरिता राखीव ठेवलेली तारीख | ०५.०५.२०२६ |
| न्यायनिर्णयाची तारीख | ०५.०५.२०२६ |
| शिक्षेची तारीख, जर दिली असेल तर | –––– |

## आरोपीचे विवरण

| अ. क्र. | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीनावर सोडल्याची तारीख | दोषारोप | शिक्षा अथवा निर्दोष मुक्त | शिक्षेबाबत विवरण | उपभोगलेली शिक्षा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | आयुष मारोती थुल | सुचना पत्रावर सोडले | २८.१०.२०२५ | ११८(१), ३५१(२), ३५१(३), ३५२ सह कलम ३(५) भा.न्या.सं. | निर्दोष मुक्त केले | – | – |
| २. | मारोती रामचंद्र थुल | | | | | | |
| ३. | दुर्गा मारोती थुल | | | | | | |

## तपासलेले साक्षीदार

अ. अभियोग पक्षातर्फे :–

| अ.क्र. | साक्षीदारांचे नाव | पुराव्यातील स्थान | निशाणी क्र. |
|---|---|---|---|
| सा.क्र.१ | बबन रामचंद्र थुल | फिर्यादी/जखमी | २८ |

ब. बचाव पक्षातर्फे :– नाही.

क. न्यायालयातर्फे :– नाही.

## निशाणी क्रमांकाची यादी

अ. अभियोग पक्षातर्फे :–

| अ.क्र. | निशाणी | पुराव्याचे स्थान |
|---|---|---|
| १. | नि.क्र.२९ | फिर्याद वरील सही |
| २. | नि.क्र.३० | छापील प्रथम खबरी अहवालावरील सही |

ब. बचाव पक्षातर्फे :– नाही.

क. न्यायालयातर्फे :– नाही.

ड. मुद्देमाल

| अ.क्र. | मुद्देमाल क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | –– | एक वेळवाची काठी ४ खडे |

## **न्या य नि र्ण य**

(दिनांक ५ मे, २०२६ रोजी पारीत)

सदर खटला हा आरोंपीविरुध्द भारतीय न्याय संहिता, २०२३ (यापुढे संक्षिप्तमध्ये 'भा.न्या.सं.' असे संबोधण्यात येईल") कलम ११८(१), ३५१(२), ३५१(३), ३५२ सह कलम ३(५) अन्वये चालविण्यात आलेला आहे.

<u>अभियोग पक्षाची संक्षिप्त हकीकत</u> :–

२. दि.१९.०४.२०२५ रोजी सायं. ७.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे बबन रामचंद्र थुल घरी हजर असताना त्याचा पुतन्या नामे आयुष मारोती थुल हा माझ्या अंगणातुन जात असता त्याला म्हटले की, 'तु माझ्या अंगणातून जायचे नाही' तेव्हा त्याने फिर्यादीशी तोंडातोंडी वाद केला नंतर फिर्यादीचा मोठा भाऊ मारोती थुल व त्याची पत्नी दुर्गा हे तेथे आले व फिर्यादीला म्हणाले की, 'तु कोण होते आमचे जाणे येणे बंद करणारा आम्ही इथूनच जावून' असे म्हणून फिर्यादीशी झगडा भांडण केले व आयुष थुल याने त्याच्या हातात असलेल्या वेळवाच्या काठीने त्याच्या डोक्यावर मारुण जखमी केले व मारोती थुल व दुर्गा थुल यांनी फिर्यादीशी झगडा भांडण करुन त्याला जिवे मारण्याची धमकी दिली. त्यानंतर फिर्यादीने पोलीस स्टेशनला जावून आरोपी विरुध्द तोंडी रिपोर्ट दिली.

३. वरील आशयाच्या तोंडी रिपोर्ट व वैद्यकीय अहवालावरुन आरोपींविरुध्द भिवापूर पोलिसांनी गुन्हा क्रमांक २३४/२०२५ हा नोंदविला. तपास पोलीस हवालदार आनंद धात्रक यांनी केला. त्यांनी घटनास्थळाला भेट देवून घटनास्थळाचा पंचनामा तयार केला, जखमीचे वैद्यकीय प्रमाणपत्र हस्तगत केले, साक्षीदारांचे बयाण नोंदविले व तपास पुर्ण झाल्यानंतर दोषारोपपत्र न्यायालयाकडे अग्रेषित केले.

४. मी आरोपींविरुध्द भा.न्या.सं. कलम ११८(१), ३५१(२), ३५१(३) व ३५२ सह कलम ३(५) अन्वये दोषारोप (नि.क्र.२२) निश्चित केले. आरोपींनी गुन्हा अमान्य केला व संपरीक्षेची मागणी केली. त्याप्रमाणे आरोपीची जबानी नि.क्र.२३ ते २५ वर नोंदविण्यात आली. साक्षीदाराच्या पुराव्यात आरोपी विरुध्द कोणताही सबळ पुरावा न आल्यामुळे आरोपींचे भारतीय नागरिक सुरक्षा संहिताचे कलम ३५१ प्रमाणे निवेदन नोंदविण्यात आले नाही व त्याबाबतचा आदेश निशाणी क्रमांक १ वर पारीत करण्यात आला.

५. अभियोग पक्षाचा खटला, आरोपीचा बचाव, विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्ता व आरोपीचे विव्दान विधिज्ञ श्री पी. एल. नागोशे यांचा सविस्तर सादरीकरणावरुन खालील मुद्दे निर्धारणाकरिता उपस्थित होतात. त्यांना मी सहकारण निष्कर्ष देत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष शाबित करतो का, दिनांक १९.०४.२०२५ रोजी ७ वा. मौजा सायगाव, ता.भिवापूर, येथील गुजरी चौक आरोपींनी त्यांच्या समान उद्देशाने फिर्यादी नामे **बबन रामचंद्र थुल** याला लाकडी काठीने डोक्यावर मारुन ईच्छापुर्वक दुखापत पोहोचविली आणि त्यायोगे भारतीय न्याय संहिता कलम ११८(१) सह कलम ३(५) अन्वये गुन्हा केला काय ? | ... | **नाही.** |
| २. | अभियोग पक्ष असे शाबित करतो का, वर नमुद तारखेस, वेळेस व ठिकाणी आरोपींनी त्यांच्या समान उद्देशाने फिर्यादी नामे **बबन रामचंद्र थुल** याला शिविगाळ केली व उद्देशपुर्वक अपमान करुन सार्वजनिक शांततेचा भंग होण्याच्या उद्देशाने प्रक्षोभित केले आणि त्यायोगे भारतीय न्याय संहिता कलम ३५२ सह कलम ३(५) अन्वये गुन्हा केला काय ? | ... | **नाही.** |
| ३. | अभियोग पक्ष असे शाबित करतो का, वर नमुद तारखेस, वेळेस व ठिकाणी आरोपींनी त्यांच्या समान उद्देशाने फिर्यादी नामे **बबन रामचंद्र थुल** याला धमकी देवून फौजदारीपात्र धाकदपटशा केली आणि त्यायोगे भारतीय न्याय संहिता कलम ३५१ (२) सह कलम ३(५) अन्वये गुन्हा केला काय? | ... | **नाही.** |
| ४. | अभियोग पक्ष असे शाबित करतो का, वर नमुद तारखेस, वेळेस व ठिकाणी आरोपींनी त्यांच्या समान उद्देशाने फिर्यादी नामे **बबन रामचंद्र थुल** याला जिवे मारण्याची धमकी देवून फौजदारीपात्र धाकदपटशा केली आणि त्यायोगे भारतीय न्याय संहिता कलम ३५१ (३) सह कलम ३(५) अन्वये गुन्हा केला काय ? | ... | **नाही.** |
| ५. | आदेश काय ? | ... | **आरोपींना निर्दोष मुक्त करण्यात आले.** |

## कारणमिमांसा

**मुद्दे क्र.१ ते ४ बाबत :–**

**६.** हे सर्व मुद्दे एकमेकांशी संलग्न असून त्यावरील पुरावा सारखाच आहे. त्यामुळे ते एकत्रित चर्चेसाठी घेण्यात आले.

**७.** अभियोग पक्षाने त्यांच्या पुरावा सिध्दतेकामी एकच साक्षीदार तपासला.

फिर्यादी/जखमी साक्षीदार बबन रामचंद्र थुल (सा.क्र.१) याने अभियोग पक्षाच्या घटनेस कोणतेही सहकार्य केले नाही, त्यामुळे त्याला अभियोग पक्षाने फितूर घोषित केले व त्याचा उलट तपास घेतला. उलट तपासणीमध्ये देखील त्याने अभियोग पक्षास सहकार्य होईल असा कोणताही पुरावा दिलेला नाही. त्यामुळे त्याची साक्ष अभियोग पक्षाच्या कोणत्याही उपयोगी नाही. अभियोग पक्षाच्या उलट तपासणी दरम्यान त्याने असे मान्य केले की, त्याचे व आरोपीमध्ये न्यायालयाच्या बाहेर समझोता झाला आहे. बचाव पक्षाच्या उलट तपासणी दरम्यान देखील त्याने असे मान्य केले की, त्याचे आरोपीसोबत संबंध चांगले आहे. त्याने असे मान्य केले की, आता त्याचा आरोपीसोबत वाद मिटला असल्यामुळे त्याला ही केस पुढे चालवायची नाही.

८. एकंदरीत अभिलेखावर आलेल्या पुराव्यावरुन असे निर्दशनास येते की, फिर्यादी/जखमी साक्षीदाराने बबन रामचंद्र थुल (सा.क्र.१) अभियोग पक्षास कोणतेही सहकार्य केलेले नाही. प्रस्तुत प्रकरणात दोन्ही बाजुनी घटनास्थळ पंचनामा, फिर्यादी/जखमी रामचंद्र याचे घटनास्थळ पंचनामा व वैद्यकीय प्रमाणपत्र हे दस्त मान्य करण्यात आल्यामुळे फिर्यादी/जखमी याचे घटनास्थळ पंचनामा नि.३२, वैद्यकीय प्रमाणपत्र नि.३३ वर सिध्द करण्यात आले. प्रस्तुत प्रकरणात वरील सिध्द दस्त पाहता अभियोग पक्षाच्या पुराव्यात हे पाहणे महत्वाचे आहे की, घटनेच्या दिवशी आरोपींनी फिर्यादीला इच्छापुर्वक मारहाण केली.

९. वरील अभियोग पक्षाच्या संपूर्ण पुराव्याचे अवलोकन करता असे निर्दशनास येते की, या खटल्यातील फिर्यादी/जखमी बबन रामचंद्र थुल (सा.क्र.१) याने अभियोग पक्षास कोणतेही समर्थन केले नाही. तसेच त्याने अभियोग पक्षाने घेतलेल्या उलट तपासणी दरम्यान असे मान्य केले की, त्याच्या व आरोपीमध्ये न्यायालयाबाहेर समझोता झालेला आहे व आरोपीसोबत त्याचे संबंध चांगले आहे व त्याला ही केस पुढे चालवायची नाही. या खटल्यात फिर्यादी बबन रामचंद्र थुल (सा.क्र.१) हा स्वतः फितूर झाल्यामुळे अभियोग पक्षाने ईतर साक्षीदार तपासले नाही. त्यामुळे अभियोग पक्षाचा खटला हा निशाणी क्र.१ वर आदेश पारीत करुन बंद करण्यात आला. आरोपीविरुध्द अभिलेखावर कोणताही सबळ पुरावा आलेला नाही.

तसेच अभियोग पक्षाने हे सिध्द केले नाही की, आरोपीने फिर्यादीला वेळवाच्या काठीने मारुन ईच्छापुर्वक दुखापत पोचविली, त्याला शिविगाळ करुन त्याचा उद्देशपुर्वक अपमान केला व त्याला जिवे मारण्याची धमकी दिली. आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द न झाल्याने आरोपी हा सदरहू गुन्ह्यातून मुक्ततेस हक्कदार आहे. करिता मी मुद्दा क्रमांक १ ते ४ ला नकारार्थी निष्कर्ष नोंदवितो.

**<u>मुद्दा क्रमांक ५ करिता</u>** :–

**१०.** मुद्दा क्रमांक १ ते ४ च्या नकारार्थी निष्कर्षानुसार अभियोग पक्ष आरोपी विरुध्दचा गुन्हा सिध्द करण्यास अपयशी ठरला. म्हणून मी मुद्दा क्र.५ करिता पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आ दे श</u>

१. आरोपी क्र.१ **आयुष मारोती थुल,** आरोपी क्र.२ **मारोती रामचंद्र थुल** व आरोपी क्र.३ **दुर्गा मारोती थुल,** याला भारतीय न्याय संहिता, २०२३ कलम ११८(१), ३५१(२), ३५१(३), ३५२ सह कलम ३(५) अन्वये शिक्षेस पात्र गुन्ह्यातुन भारतीय नागरीक सुरक्षा संहिताचे कलम २७१(१) नुसार निर्दोष मुक्त करण्यात येते.

२. आरोपीने पुर्वी दिलेले बंधपत्र व जामीनपत्र रद्द करण्यात येते.

३. आरोपीने भारतीय नागरीक सुरक्षा संहिता ४८१ अंतर्गत रुपये १५०००/– (पंधरा हजार पाचशे) चे वैयक्तिक व जामीन बंधपत्र द्यावे.

४. खटल्यात जप्त असलेली एक वेळवाची काठी ४ खडे ही मुल्यहिन असल्याने अपील कालावधीनंतर नष्ट करण्यात यावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात अधिघोषित करण्यात आला.)

LAD SURAJ JANARDAN
Digitally signed by LAD SURAJ JANARDAN
Date: 2026.05.05 15:02:18 +0530

भिवापूर
दिनांक – ०५.०५.२०२६.

(एस. जे. लाड)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
भिवापूर.

*******

CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. File of judgment/order are word to word as per original judgment/order.

Name of Stenographer : K. S. Kathane
to C.J.J.D. & J.M.F.C., Bhiwapur.